Publication: Prahaar
Date: 30/3/2019
Page: 2
Column: 1

प्रहार
शनिवार, ३० मार्च २०१९

वेचक

## 'अर्थ अवर' पाळण्याचे आवाहन

**मुंबई :** अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) ही खासगी वीज वितरण कंपनी पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहे. कंपनीने शहरातील आपल्या २७ लाख ग्राहकांसह सर्व भागधारकांना शनिवार, दि. ३० मार्च २०१९ रोजी 'अर्थ अवर' पाळण्याचे आवाहन केले आहे. यासाठी आपल्या घरांतील व आस्थापनांतील वीजवापर संध्याकाळी ८.३० ते ९.३० या काळात स्वेच्छेने बंद ठेवून एक शाश्वत भविष्यकाळ घडवण्यासाठी पाठिंबा द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.